।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**Phone : (02462) 229294** DIRECTOR-BOARD OF EXAMINATIONS & EVALUATION **website: srtmun.ac.in**
**Fax : (02462) 229572** **e-mail :directorboee@srtmun.ac.in**

जा.क्र.परीक्षा/समन्वय/२०२०—२१/४३९ दिनांकः १३.१०.२०२०

<u>तातडीचे परीपत्रक</u>

**प्रति,**
**मा.प्राचार्य तथा परीक्षा केंद्र प्रमुख,**
**उन्हाळी—2020 परीक्षा,**
सर्व संलग्नीत पदवी/पद्व्युत्तर महाविद्यालये प्रस्तुत विद्यापीठ.

**विषयः उन्हाळी—2020 परीक्षा कार्यपध्दतीबाबत परीक्षा केंद्रासाठी महत्वाच्या सूचना.**

महोदय,

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उन्हाळी—2020 पदवी, पद्व्युत्तर व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि. 15/10/2020 पासुन सुरू होत आहेत. परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आले आहे. तसेच उन्हाळी—2020 परीक्षा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे उपाय योजना आपल्या परीक्षा केंद्रामार्फत करण्यात याव्यात.

1. उन्हाळी परीक्षा—2020, परीक्षेसाठी परीक्षा केंद्राची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर करण्यात आली असून त्यानुसार परीक्षार्थीसाठीची बैठक व्यवस्था व मनुष्य बळाचे नियोजन करण्यात यावे.

2. उन्हाळी—2020 परीक्षा ही Online व Offline पध्दतीने MCQ प्रश्नसंचाव्दारे घेण्यात येणार आहे. त्यामुळे या परीक्षांच्या सर्व परीक्षार्थ्याकडून Online व Offline व्दारे परीक्षा देणेबाबत समंतीपत्राव्दारे माहिती मागविण्यात आलेली आहे. परंतु सर्व परीक्षा केंद्र प्रमुखांनी LAC नुसार सर्व विद्यार्थ्याची बैठक व्यवस्था ही कोविड—19 या आजाराच्या प्रादूर्भाव टाळण्यासाठी शासनाने निर्देशीत केलेल्या सर्व सुचनांचे पालन करून करावी. सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षांचे LAC हे विद्यापीठ संकेत स्थळावर Online portal मध्ये देण्यात येत आहे.

3. सर्व परीक्षा केंद्रानी परीक्षार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या आरोग्याची काळजी घ्यावी त्यासाठी सर्व परीक्षार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तोंडाला मास्क लावणे बंधनकारक राहील. परीक्षा दालनात प्रवेश करण्यापूर्वी परीक्षार्थ्यांचे शरीर तापमान तपासणे बंधनकारक आहे.

4. सर्व परीक्षा केंद्रावर उन्हाळी—2020 परीक्षेसाठी प्रश्न पत्रिका हया Online E-Delivery मार्फत पाठविण्यात येणार आहे, त्यामुळे प्रश्न पत्रिका downloading करणेसाठी स्वतंत्र गोपनीय कक्ष

असणे आवश्यक असून त्यामध्ये अद्यावत संगणक वेब कॅमेरॅसह किंवा लॅपटॉप, झेरॉक्समशीन, प्रिंटर तसेच विद्युतपुरवठा अखंड राहणे करीता युपीएस/जनरेटर इत्यादी साहित्य उपलब्ध ठेवावे. या गोपनीय कक्षामध्ये CCTV यंत्रणा चालू राहणे अनिवार्य आहे.

5 केंद्र प्रमुखांनी त्यांच्या परीक्षा केंद्रावर दररोज वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिका download करून त्यांच्या आवश्यकतेनुसार झेरॉक्स प्रती काढून परीक्षा घ्यावी. यामध्ये प्रश्नपत्रिकेंच्या गोपनीयतेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

6. विद्यापीठा मार्फत घेण्यात येणा–या पदवी व पदव्युत्तर अंतिम वर्शाच्या परीक्षांच्या OMR उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन हे केंद्रीय मूल्यांकन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड येथे होणार आहे त्यामुळे दररोज परीक्षा संपल्यानंतर विशय निहाय (कोडसह), वर्ग निहाय, उपस्थिती अहवाल प्रष्न पत्रिकेच्या दोन प्रती व उत्तरपत्रिका सिलबंद करून त्या दररोज महाविद्यालयीन कर्मचारी यांच्या हस्ते खालील जिल्हानिहाय उत्तरपत्रिका संकलन केंद्रावर पाठविण्यात याव्यात यासाठी महाविद्यालयीन कर्मचा–यांना प्रवास भत्ता (TA/DA) व मानधन देय राहील.

वरील प्रमाणे उत्तरपत्रिका पाठवितांना परीक्षेच्या पहिल्या दिवषी पहिल्या तीन सत्राचे व दुस–या दिवसापासून आदल्या दिवषीच्या एक सत्राच्या उत्तर पत्रिका व त्या त्या दिवसाचे तीन सत्राच्या अषा चार सत्राच्या उत्तरपत्रिका पाठवाव्यात. हया (OMR) उत्तरप्रत्रिकांची स्कॅनिंग करण्यात येणार आहेत त्यामुळे त्याची घडी/गुंडाळी करू नये.

| **अनु. क्र.** | **परीक्षा केंद्राचे ठिकाण** | **उत्तरपत्रिका संकलन केंद्र जिल्हा /तालुका** |
|---|---|---|
| **नांदेड जिल्हा** | | |
| १ | नांदेड शहरातील सर्व परीक्षा केंद्र व कंधार, लोहा, अर्धापूर, मुदखेड, उमरी, धर्माबाद, वसमत व आखाडा बाळापूर | केंद्रीय मूल्यांकन केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ, नांदेड |
| २. | नायगांव येथील परीक्षा केंद्र, अर्जापूर, शंकरनगर, देगलूर, मुखेड, हाणेगांव, वसंतनगर कोटग्याळ | शरदचंद्र महाविद्यालय, नायगांव |
| ३. | भोकर येथील परीक्षा केंद्र, किनवट, माहूर, हिमायतनगर, हादगांव | दिगंबर बिंदू महाविद्यालय, भोकर |

| परभणी/हिंगोली जिल्हा | | |
|---|---|---|
| १ | परभणी शहरातील सर्व परीक्षा केंद्र, जिंतूर, पूर्णा, सेलू, मानवत व पाथरी | कै.कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी |
| २ | गंगाखेड येथील दोन्ही परीक्षा केंद्र, पालम, राणीसावरगांव, सोनपेठ | संत जनाबाई महाविद्यालय, गंगाखेड |
| ३ | हिंगोली शहरातील सर्व परीक्षा केंद्र व सेनगांव, औंढा, कळमनूरी | आदर्श महाविद्यालय, हिंगोली |
| **लातुर जिल्हा** | | |
| १ | लातूर शहरातील सर्व परीक्षा केंद्र व मुरूड, रेणापूर, औसा, निलंगा, बाभळगांव, नळेगांव, शिरूर अनंतपाळ, किल्लारी | उपकेंद्र प्रस्तुत विद्यापीठ, लातूर |
| २ | अहमदपूर येथील परीक्षा केंद्र व चाकुर, किनगांव, हाडोळती, शिरूरताजबंद, चापोली | महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर |
| ३ | उदगीर येथील सर्व परीक्षा केंद्र व जळकोट, देवणी औराद शहाजनी, घोणसी, मुक्रामाबाद | शिवाजी महाविद्यालय, उदगीर |

7. जर विद्यार्थ्याने online परीक्षेसाठी संमतीपत्र दिले असेल व तो काही कारणास्तव लेखी परीक्षा देऊ इच्छित असेल तर त्यास तसे लेखी हमीपत्र घेऊन परीक्षा देण्यास परवानगी द्यावी.

8. उन्हाळी–2020, परीक्षेसाठी दीव्यांग विद्यार्थ्यांना द्यावयाच्या सोई/सुविधा संदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे दिनांक 04 मार्च 2017 या शासन निर्णयानुसार कार्यवाही करावी. तसेच दीव्यांग विद्यार्थ्याची बैठक व्यवस्था तळमजल्यावरील परीक्षा दालनामध्ये करण्यात यावी. तसेच शासन निर्णयातील तरतुदीनुसार सोई सुविधा व लेखणीक वापरण्याची अनुमती द्यावी व त्यास परीक्षेचा अधीकचा वेळ 20 मिनीटे देण्यात यावा. संपूर्ण सूचना विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यात आलेल्या आहेत.

9. सर्व परीक्षा केंद्राना शरीर तापमापक यंत्र खरेदीसाठी रू. 2000/–, ऑक्सीमीटरसाठी रू. 1000/– परीक्षा केंद्र निर्जंतूकीरण करणेय व सर्व परीक्षा दालनामध्ये Sanitizer करणेसाठी रू. 2000/– याप्रमाणे खर्चासाठी मान्यता देण्यात येते. या सर्व साहित्यांचे देयक परीक्षा केंद्र देयकासोबत सादर करावेत.

10. सर्व परीक्षा केंद्र प्रमुखांनी दररोज विद्यार्थ्यांची Online attendance (present /absent) भरणे बंधनकारक आहे.

11. दररोज संपन्न झालेल्या उन्हाळी–2020, परीक्षांची माहिती महाराष्ट्र शासनास कळविण्यात येणार आहे त्यामुळे सर्व परीक्षा केंद्र प्रमुखांनी दररोजची परीक्षा विषक माहिती विद्यापीठ संकेतस्थळावरील Examinatin Section मधील Service of Exam. Department मध्ये Summer-2020 Examination Event चा वापर करावा यासाठी लागणारा येजरनेम व पासवर्ड आपल्या

इमेलवर व मोबाईल नंबर उपलब्ध करून देण्यात येईल. जे परीक्षा केंद्र माहिती देणार नाहीत त्यांचे नावे शासनाकडे पाठविण्यात येतील व नियमानुसार त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

12. परीक्षा केंद्रावरील महाविद्यालयातील College I.T. Coordination यांनी online परीक्षा देणा–या विद्यार्थ्यांस येणा–या तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी नेमण्यात आलेला आहे, त्यामुळे त्यांना परीक्षेतील पर्यवेक्षणाचे काम देऊ नये.

13. प्रश्नपत्रिका downloading /वेळापत्रक/प्रश्नपत्रिकांबाबत इतर काही तांत्रिक अडचण असल्यास विद्याशाखानिहाय खालील प्रमाणे भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Faculty of Science and Technology | - | 9881340781, 9423438684 |
| 2) | Faculty of Humanities | - | 9423138636, 9730027417 |
| 3) | Faculty of Commerce and Management | - | 8805550438, 9881365324 |
| 4) | Faculty of Interdeciplinary | - | 8830094854, 9850241233, 9657580304 |

जर वरील भ्रमणध्वनीवर संपर्क झाला नाही तर परीक्षा विभागातील खालील अधिकारी यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Deputy Registrar | - | 9923409493 |
| 2) | Assistant Registrar | - | 9356619967 |

OMR उत्तर पत्रिकांचा अतिरिक्त साठा उपकेंद्र लातूर, परभणी, न्यु.मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली येथे असून परीक्षेदरम्यान आवश्यकतेनुसार मागणीपत्र देवून सदर उत्तरपत्रिका हस्तगत कराव्यात.

कृपया वरील प्रमाणे पूर्वतयारी करावी व उन्हाळी–2020 परीक्षा यशस्वीरीत्या पार पाडणेसाठी सहकार्य करावे, कळावे.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ